**प्रेसनोट** **दिनांक २४/०८/२०१९**

## लष्कर पोलीस स्टेशन पुणे शहर

## एका जेष्ठ नागरीकाचे पोलीसांनी वाचविले प्राण.

आज दि. २४/०८/२०१९ रोजी सेटंर स्ट्रीट मार्शलचे पोलीस कर्मचारी पो.शि.९८२५ सलमान शेख, पो शि.८१६४ पवार हे दिवसपाळी कर्तव्यावर असतांना त्यांना चारबावडी चौकीकडुन ड्युटी अंमलदार सहा.पो फौज. दाहोत्रे यांनी कळविले की, साचापीर स्ट्रीट कॅम्प पुणे येथे एक जेष्ठ नागरीक नामे. पौरूशस्प दस्तुर वय ७० वर्षे रिटायर टाटा मोटर्स हे अनेक वर्षापासुन एकटे रहात असुन मागील दोन दिवसांपासुन घराचा दरवाजा उघडला नाही. त्यांचे घराचा दरवाजा आतुन लॉक आहे. तसेच सध्या ते आजारी आहेत. व दोन दिवसापासुन दरवाजा न उघडल्याने आजू बाजूला राहणारे शेजारचे लोकांनी चारबावडी चौकीत येवून कळविले आहे. आपण सदर पत्त्यावर जावून खात्री करा असे कळविल्याने सेंटर स्ट्रीट मार्शलचे पोलीस कर्मचारी पो.शि.९८२५ सलमान शेख, पो शि.८१६४ पवार हे यांनी तात्काळ नमुद पत्त्यावर जावून खात्री केली असता. घराचा दरवाजा बंद होता. त्याच वेळी समर्थ पोलीस स्टेशन कडील पो शि निलेश साबळे, पोशि सुमित कुटे हे क्रिस्प टास्क मधील आरोपी चेक करणेसाठी सदर भागात आले असता सदरची गर्दी पाहुन ते देखील त्यांचे मदतीला आले. त्या सर्वानी मिळुन बंद लॉक असलेला दरवाजा तोडुन आत जावून पाहीले असता सदरचे जेष्ठ नागरीक हे बेडवरून खाली पडलेल्या अवस्थेत दिसले. सदर परिस्थीतीचा विचार करून पो. शि. पवार यांनी १०८ नंबरला कॉल करून रूग्णवाहीका बोलावून घेतली. पो.शि. शेख यांनी सदर जेष्ठ नागरीक यांना दोन्ही हाताने उचलुन घेऊन रूग्णवाहीकेत ठेवले व उपचारा साठी रूबी हॉल हॉस्पिटल, पुणे येथे दाखल केले आहे. सध्या त्यांचेवर अति दक्षता विभागत उपचार चालू आहेत.

सदरची कामगीरी लष्कर पोलीस स्टेशन कडील सेटंर स्ट्रीट मार्शलचे पोलीस कर्मचारी पो.शि.९८२५ सलमान शेख, पो शि.८१६४ पवार यांनी समर्थ पोलीस स्टेशन कडील पो शि निलेश साबळे, पोशि सुमित कुटे यांचे मदतीने मा. चंद्रकांत द. भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, लष्कर पोलीस स्टेशन पुणे यांचे मार्गदर्शना खाली केली आहे.